# स्त्रीसाठी आध्यात्मिकदृष्ट्या उपयुक्त असलेले कपडे

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '*' या चिन्हाने दर्शवले आहेत.)


- मनोगत ७
- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील 'एक विद्वान' यांनी केलेले भाष्य ८
- 'सूक्ष्म' या शब्दाच्या संदर्भातील काही संज्ञांचा अर्थ १२
- ज्ञान-प्राप्तकर्त्या साधकांचा परिचय १५

१. अंगावर सात्त्विक कपडे नसतांना आणि असतांना व्यक्तीकडून ग्रहण होणारी वाईट किंवा चांगली शक्ती यांचे प्रमाण १७

२. स्त्रियांच्या कपड्यांचे प्रकार १७

  २ अ. परकीय पद्धतीनुसार (संस्कृतीनुसार) असलेले अयोग्य कपडे १७

    * पंजाबी वेश घातल्यामुळे होणारे तोटे १८
    * शर्ट-पँट घातल्यामुळे मांत्रिकाला आक्रमण करणे सोपे जाणे २३
    * बिनबाह्यांचा टॉप-पँट, टॉप-स्कर्ट घातल्याने होणारे दुष्परिणाम २३
    * तोकडे कपडे घालणे म्हणजे वाईट शक्तींना आमंत्रण ! २६
    * वाईट शक्तींचा त्रास असलेल्यांना परकीय परंपरेनुसार (संस्कृतीनुसार) असलेले कपडे आवडणे ३०

  २ आ. हिंदु संस्कृतीनुसार असलेले योग्य कपडे ३२

    २ आ १. परकर-पोलके आणि त्यांचा कुंडलिनीचक्रांशी संबंध ३२

    २ आ २. साडी ३४

      * साडीमुळे देवतेच्या तत्त्वाची अनुभूती येणे ३५
      * नऊवारी साडीच्या पदराच्या टोकांमुळे स्त्रीचे रक्षण होणे ४२
      * सहावारी साडी नेसतांना आध्यात्मिक उपाय होणे आणि साडी नेसण्याची योग्य पद्धत कळणे ४७

* स्त्रियांनी साडीचा पदर डोक्यावरून घेण्याची पद्धत ६१
* नवीन साडी परिधान करण्याची प्रथा ६४
* प्रसादस्वरूप साडी नेसण्याने होणारे लाभ आणि त्यासंदर्भातील अनुभूती ६४
* उन्नत साधिकेतील चैतन्याचा परिणाम झालेली साडी नेसल्यावर आलेली अनुभूती ७०
२ आ ३. शाल ७१
२ इ. स्त्रियांच्या विविध कपड्यांची तुलना ७२
२ ई. स्त्रियांच्या शरिराच्या वरच्या भागात घालायच्या वस्त्राचा प्रकार आणि रंग यांनुसार त्यातून मिळणारी सात्त्विकता ८५
२ उ. स्त्रियांच्या कपड्यांचे प्रकार आणि त्यांतून मिळणारी वाईट किंवा चांगली शक्ती यांचे प्रमाण ८९
२ ऊ. स्त्रियांच्या कपड्यांचे प्रकार आणि ते वाईट किंवा चांगल्या शक्तींनी भारित होण्याचे प्रमाण ९०
३. बाळाचे कपडे ९१
४. हिंदूंनो, अधर्माचरण करू नका आणि होत असल्यास रोखा ! ९२
५. सात्त्विक वस्त्रालंकारांसह आचार-विचारही सात्त्विक असणे आवश्यक ९३
६. भाव असलेले, चांगली पातळी असलेले, संत आणि गुरुकृपायोगानुसार साधना करणारे यांनी बाह्य वेशभूषेला महत्त्व देण्याची आवश्यकता नसणे ९३

## मनोगत

जीन्स, टी-शर्ट, चुडीदार, पंजाबी वेश यांसारखी परकीय परंपरेतून आलेली वेशभूषा ही सध्या हिंदु स्त्रीच्या जीवनशैलीचा अविभाज्य घटक बनली आहे. याउलट हिंदु संस्कृतीची ओळख सांगणाऱ्या पारंपरिक नऊवारी साडीचे अस्तित्व आता बहुतांश खेडेगावापुरतेच सीमित राहिले आहे. व्यक्तीच्या वेशभूषेचा परिणाम नकळत तिच्या मनोवृत्तीवर होत असतो. चुडीदार, जीन्स यांसारख्या सध्याच्या प्रचलित राजसिक-तामसिक वेशभूषेमुळे स्त्रीची वृत्ती उच्छृंखल आणि भोगवादी बनते, तर सहावारी अन् नऊवारी साडी या सात्त्विक वेशभूषेमुळे स्त्रीची वृत्ती शालीन आणि धर्माचरणी बनते.

धर्माचरणातून ईश्वराप्रती भक्तीभाव निर्माण होऊन व्यक्तीचा प्रवास ईश्वरप्राप्तीकडे होऊ लागतो.

राजसिक-तामसिक वेशभूषेमुळे होणारा आणखी एक तोटा म्हणजे, त्या वेशभूषेमुळे व्यक्तीला वाईट शक्तींचा त्रास होण्याची शक्यता वाढते. याउलट सात्त्विक वेशभूषा ही वाईट शक्तींसमेवतच्या युद्धातील एक अमोघ शस्त्रच ठरते. परकीय पद्धतीतून (संस्कृतीतून) आलेली वेशभूषा अयोग्य कशी आणि हिंदु संस्कृतीतून आलेली वेशभूषा योग्य कशी, यांविषयीची अध्यात्मशास्त्रीय कारणमीमांसा प्रस्तूत ग्रंथात स्पष्ट केली आहे. 'अध्यात्म' हे सूक्ष्मातील जाणून घेण्याचे, म्हणजे अनुभूतीचे शास्त्र आहे. यासाठी विविध वेशभूषा केल्यावर त्यांचा सूक्ष्मातून नेमका काय परिणाम होतो, हे दर्शवणारे साधिकांनी केलेले सूक्ष्मातील प्रयोग, तसेच वेशभूषेविषयी सूक्ष्म-ज्ञानविषयक चित्रे आणि साधकांच्या अनुभूतीही या ग्रंथात अंतर्भूत केल्या आहेत.

जीवनात प्रत्येक गोष्ट सात्त्विक करायचा प्रयत्न करणे, म्हणजे जीवनाचे अध्यात्मीकरण करणे होय. साडीसारखी सात्त्विक वेशभूषा करणे, हा जीवनाचे अध्यात्मीकरण करण्याचाच एक भाग आहे. तसेच स्त्रियांनी परकीय पद्धतीचे कपडे परिधान केले, तर भावी पिढीवरही चुकीचे संस्कार होतील. शंस्कारित आणि आदर्श पिढी निर्माण करण्याचे उत्तरदायित्व आता या पिढीतील स्त्रियांवर आहे.

रज-तमाचे प्राबल्य असलेल्या कलियुगात सात्त्विक वेशभूषेच्या जोडीला साधना केली, तरच रज-तमापासून सर्वंकष रक्षण होईल आणि आनंद मिळेल. असे करण्याची सद्बुद्धी सर्वांना होवो, ही श्री गुरुचरणी प्रार्थना. **– संकलक**